**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसिद्धीपत्रक**
5.04.2025

- **महाराष्ट्र शासनाच्या माझी वसुंधरा अभियान अंतर्गत स्वच्छता आणि पर्यावरणाशी निगडित विषयांवर चित्रकला स्पर्धा संपन्न**

महाराष्ट्र शासनाच्या "माझी वसुंधरा" अभियान अंतर्गत पर्यावरण संवर्धन व स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून, शालेय विद्यार्थ्यांसाठी दिनांक ०५ एप्रिल २०२५ रोजी स्वच्छता आणि पर्यावरणाशी निगडित विषयांवर चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मा. राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या चित्रकला स्पर्धेमध्ये "संवर्धन पर्यावरणाचे, संवर्धन वसुंधरेचे," "माझ्या शाळेचा सुंदर परिसर," "स्वच्छ मिरा भाईंदर शहर," "प्लास्टिकमुक्त परिसर" आणि "वसुंधरेचे जतन करणे काळाची गरज" या विषयांवर विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून रंगसंगतीचा अद्वितीय अविष्कार साकारला.

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मा. आयुक्तांनी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत पर्यावरण संरक्षणाच्या महत्त्वावर विशेष भर दिला. "तुम्हीच आपल्या भविष्यातील पर्यावरणाचे शिल्पकार आहात. त्यामुळे आतापासूनच स्वच्छता व हरित जीवनशैली अंगीकारा आणि प्रदूषणमुक्त, प्लास्टिकमुक्त आणि निसर्गाशी सुसंवाद साधणारे भविष्य घडवा," असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला.

स्पर्धे दरम्यान उपस्थित विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी व मान्यवरांनी "माझी वसुंधरा" व स्वच्छतेची शपथ घेतली. स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे मा. आयुक्त यांनी विशेष कौतुक केले आणि त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच, महापालिकेच्या शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी महापालिका प्रशासन, शिक्षक व मुख्याध्यापक सातत्याने कार्यरत राहतील, असे आश्वासन त्यांनी दिले. कार्यक्रमास, उपायुक्त (मुख्यालय) कल्पिता पिंपळे, उपायुक्त प्रसाद शिंगटे, शहर अभियंता दिपक खांबित, उद्यान अधिक्षक, अधिकारी, महापालिकेच्या शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.